आधुनिक शहरातील घडामोडी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

e Paper

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in रविवार दिनांक 03/05/2026 METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 116 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com

# नराधम आरोपीला कठोरातील कठोर शिक्षा देणार - सुनेत्रा पवार

## नसरापूर घटनेतील आरोपीविरोधात फास्टट्रॅक न्यायालयात खटला चालवणार

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे - नसरापूर येथे घडलेली घटना अत्यंत दुर्दैवी असून समाजमनाला हादरवणारी आणि माणुसकीला काळीमा फासणारी आहे. या घटनेच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आज पुणे येथील धायरी येथे जाऊन पीडित मुलीच्या पालकांची भेट घेतली.**

**यावेळी त्यांनी कुटुंबीयांचे सांत्वन करत त्यांच्याशी संवाद साधला. शासन त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे असून नराधम आरोपीवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा विश्वास त्यांना दिला.**



या भेटीदरम्यान उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी घटनास्थळावरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी दूरध्वनीवर संपर्क साधून संपूर्ण घटनेची माहिती दिली. या प्रकरणात खटला फास्टट्रॅक न्यायालयात चालवून आरोपीला कठोरात कठोर शिक्षा मिळावी, अशी मागणी केली. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही सदर खटला फास्टट्रॅक कोर्टात चालवून आरोपीला मृत्युदंडापर्यंतची शिक्षा होण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करेल असे सांगितले.

दरम्यान, हे अमानुष कृत्य करणारा आरोपी सध्या पोलिसांच्या ताब्यात असून त्याच्याविरोधात सबळ पुराव्यांच्या आधारे दोषारोपपत्र लवकरात लवकर न्यायालयात दाखल करण्याच्या सूचना संबंधित पोलिस अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

सदर प्रकरणाचा खटला फास्टट्रॅक न्यायालयात चालवण्यात येणार असून यासाठी विशेष सरकारी वकील नेमण्यात येणार आहे. तसेच पॉक्सो कायद्यानुसार आरोपीस अत्यंत कठोर शिक्षा मिळावी यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी स्पष्ट केले.

अशा प्रकारच्या घटना पुन्हा घडू नयेत यासाठी संबंधित यंत्रणांना कठोर पावले उचलण्याचे निर्देश देण्यात आले असून, दोषींना कोणतीही सूट दिली जाणार नाही, असा ठाम इशाराही उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी यावेळी दिला.

# महापौर रवि लांडगे यांचा स्वगणनेतून जनगणना मोहिमेला शुभारंभ

## नागरिकांना सहभागाचे आवाहन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : जनगणना 2027 या महत्त्वाच्या राष्ट्रीय उपक्रमाची महाराष्ट्रात आजपासून सुरुवात झाली असून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे महापौर रवि लांडगे यांनी स्वतः ऑनलाइन स्वगणना पूर्ण करून या मोहिमेचा प्रारंभ केला. नागरिकांनीही पुढाकार घेत या प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले आहे.**



महापौर रवि लांडगे यांनी https://se.census.gov.in या संकेतस्थळावर भेट देत आवश्यक माहिती भरून स्वगणना प्रक्रिया पूर्ण केली. सर्व 34 प्रश्नांची अचूक माहिती देत त्यांनी नोंदणी केली आणि 'सेल्फ एन्युमरेशन आयडी' प्राप्त केला. त्यांच्या या कृतीमुळे नागरिकांमध्ये सकारात्मक संदेश पोहोचला आहे.

यावेळी महापौर रवि लांडगे म्हणाले, जनगणना ही देशाच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यावश्यक आहे. अचूक माहितीमुळे शासनाला योग्य नियोजन करता येते. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने जबाबदारीने या उपक्रमात सहभागी व्हावे. 1 मे ते 15 मे 2027 या कालावधीत स्वगणना सुविधा उपलब्ध असून नागरिकांना घरबसल्या ही प्रक्रिया पूर्ण करता येणार आहे.

याशिवाय, 16 मे ते 14 जून दरम्यान प्रगणकांमार्फत घरोघरी भेट देऊन उर्वरित जनगणना प्रक्रिया पार पडणार आहे. तरी अधिकाधिक नागरिकांनी स्वगणना करून सहकार्य करावे, असे आवाहन महापौर रवि लांडगे यांनी केले आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

रविवार दिनांक 03/05/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# एमआयटी एडीटी विद्यापीठात पदवी फॅशन शो दिमाखात संपन्न

**दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत**

**पुणे: फॅशन म्हणजे केवळ डिझाईन नव्हे, तर ती आपली ओळख असते. आपण केलेल्या प्रत्येक डिझाईनद्वारे जगाला त्यांच्या संस्कृतीची, वेशभूषेची एक कथा सांगितली जाते. त्यामुळे स्वतःच्या कल्पनांशी कायम प्रामाणिक राहा, सातत्याने नवकल्पना करत राहा आणि जगाला आणखी सुंदर बनवा, असे मत पेपरमिंट क्लोदिंग प्रा. लि. चे व्यवस्थापकीय संचालक संतोष कटारिया यांनी मांडले.**



ते एमआयटी आर्ट, डिझाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठाच्या इन्स्टिट्यूट ऑफ डिझाईन (आयओडी)च्या फॅशन विभागाचा 11 वा वार्षिक ग्रॅज्युएशन फॅशन शो (जीएफएस) 2026 निमित्ताने बोलत होते. याप्रसंगी 'ग्लॅड यू केम अँड ग्लॅड वी मेट'चे संस्थापक मॅडी अमृतकर, सुप्रसिद्ध फॅशन डिझायनर टीना रांका, विद्यापीठाचे कार्याध्यक्ष तथा प्र-कुलपती प्रा. डॉ. मंगेश कराड, कुलगुरू प्रा. डॉ. राजेश एस., प्रोवोस्ट डॉ. सायली गणकर, प्र-कुलगुरु डॉ. नचिकेत ठाकूर, प्रा. डॉ. दांडेश्वर बिसोई, तसेच फॅशन डिझाईन विभाग प्रमुख डॉ. अर्शिया कपूर आदी उपस्थित होते.

या फॅशन शोमध्ये 2022–2026 या बॅचमधील बी.डिझ. फॅशन कम्युनिकेशन, बी.डिझ. फॅशन डिझाईन आणि एम.डिझ. फॅशन मॅनेजमेंट व मार्केटिंग या अभ्यासक्रमांतील विद्यार्थ्यांनी डिझाईन कलेक्शन्स, फॅशन फिल्म्स, प्रकाशने आणि ब्रँडिंग प्रोजेक्ट्स सादर केले. प्रत्येक सादरीकरणातून विद्यार्थ्यांची वैयक्तिक डिझाईन ओळख आणि व्यावसायिक तयारी स्पष्टपणे दिसून आली.

यावेळी संतोष कटारिया यांनी बाजारपेठेचे आकलन आणि ग्राहकांची गरज समजून घेण्याचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच सर्जनशीलतेसोबत व्यावसायिक दृष्टीकोन आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच मॅडी अमृतकर यांनी विद्यार्थ्यांना मजबूत नेटवर्क तयार करण्याचा, सहकार्याला प्राधान्य देण्याचा आणि डिजिटल ओळख निर्माण करण्याचा सल्ला दिला.

विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाला उपस्थित पालक व डिझाईन क्षेत्रातील विविध व्यावसायिक यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. एमआयटी एडीटीचा ग्रॅज्युएशन फॅशन शो हा उदयोन्मुख डिझायनर्ससाठी एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरत असून, त्यांच्या व्यावसायिक प्रवासाची भक्कम सुरुवात

# डिजिटल जनगणनेत सहभागी व्हा,देशाच्या प्रगतीत हातभार लावा!

## भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांचे नागरिकांना आवाहन

**दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात 16 व्या राष्ट्रीय जनगणनेचा ऐतिहासिक टप्पा सुरू झाला आहे. 1 मे 2026 पासून देशभरात 'स्व-गणनेला' (Self-Enumeration) प्रारंभ झाला असून, पिंपरी-चिंचवडमधील नागरिकांनी या पहिल्या डिजिटल जनगणनेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी केले आहे.**



आमदार महेश लांडगे यांनी आज स्वतः आपल्या कुटुंबीयांसह ऑनलाइन पद्धतीने स्व-गणना पूर्ण केली. यावेळी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाचे अधिकारी सुरज टिंगरे, किरण गव्हाणे, अरूण गुंडगळ, राहुल शेडगे उपस्थित होते. या मोहिमेबाबत माहिती देताना आमदार लांडगे म्हणाले की, "ही देशातील पहिली डिजिटल जनगणना असून प्रत्येक नागरिकाचा सहभाग यामध्ये मोलाचा आहे. महाराष्ट्रभरातील जनतेने 1 ते 15 मे या कालावधीत se.census.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन आपल्या कुटुंबाची माहिती भरावी आणि आपली जबाबदारी पार पाडावी."

**'आपली जनगणना, आपला विकास'**

"आपली जनगणना, आपला विकास हा मंत्र समोर ठेवून आपण सर्वांनी जबाबदार नागरिक म्हणून या प्रक्रियेत सहभागी होणे आवश्यक आहे. डिजिटल माध्यमाचा वापर करून आपली माहिती अचूकपणे नोंदवल्यास देशाच्या भविष्यातील नियोजनाला गती मिळेल," असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला. आमदार लांडगे यांनी स्वतः पुढाकार घेतल्यामुळे शहरात या मोहिमेबाबत जनजागृती निर्माण होत असून, जास्तीत जास्त नागरिकांनी 15 मे पूर्वी आपली नोंदणी पूर्ण करावी, असे आवाहन प्रशासनाच्या वतीनेही करण्यात आले आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

रविवार दिनांक 03/05/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# तडीपार आरोपीकडून गावठी कट्टा जप्त

## तळेगाव एमआयडीसी पोलिसांची धडक कारवाई

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**तळेगाव परिसरात तडीपार आदेशाचा भंग करून बेकायदेशीर शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीला पोलिसांनी रंगेहात पकडत त्याच्याकडून गावठी कट्टा व जिवंत काडतूस जप्त केले. या कारवाईमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून, तळेगाव एमआयडीसी पोलिसांच्या तत्परतेचे कौतुक होत आहे.**




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही कारवाई 30 एप्रिल 2026 रोजी दुपारी सुमारे 2.40 वाजण्याच्या सुमारास वराळे-आंबी रोड ते आशियाना सोसायटीकडे जाणाऱ्या रस्त्यालगत, ता. मावळ, जि. पुणे येथे करण्यात आली. याप्रकरणी तळेगाव एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक 105/2026 नोंद करण्यात आला आहे.

या प्रकरणी आरोपी अनिल जगन जाधव (वय 26, रा. समता कॉलनी, वराळे, ता. मावळ) याला अटक करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, संबंधित आरोपीस पोलीस उपायुक्त परिमंडळ-2 यांच्या आदेशानुसार 29 सप्टेंबर 2025 रोजी दोन वर्षांसाठी पुणे जिल्हा व खालापूर तालुक्यातून तडीपार करण्यात आले होते. असे असतानाही आरोपी आदेशाचे उल्लंघन करून आंबी गाव हद्दीत आढळून आला.

पोलिसांनी झडती घेतली असता आरोपीकडून सुमारे 25 हजार रुपये किमतीचा देशी बनावटीचा लोखंडी गावठी कट्टा (पिस्तूल) व 1 हजार रुपये किमतीचे एक जिवंत काडतूस जप्त करण्यात आले. संबंधित शस्त्रावर पितळेची बॉडी, लोखंडी बॅरल आणि लाकडी कव्हर असल्याचेही स्पष्ट झाले आहे.याशिवाय, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाने लागू केलेल्या मनाई आदेशांचे (महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम 37 (1) (3)) उल्लंघन केल्याप्रकरणी तसेच भारतीय हत्यार कायदा 1959 अंतर्गतही आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलीस हवालदार मरागजे यांच्या फिर्यादीवरून गुन्हा नोंद करण्यात आला असून, पुढील तपास तळेगाव एमआयडीसी पोलीस करत आहेत. पोलिसांनी अशा प्रकारच्या गुन्हेगारांविरोधात कठोर कारवाई सुरूच राहणार असल्याचा इशाराही दिला आहे.

# विद्यार्थ्यांच्या नावात आईचे नाव अनिवार्य! शाळांमध्ये नियम लागू

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : राज्यातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या ओळखीच्या पद्धतीत महत्त्वपूर्ण बदल करण्यात आला असून, येत्या शैक्षणिक वर्षापासून विद्यार्थ्यांच्या नावात आईचे नाव अनिवार्य करण्यात आले आहे.

या निर्णयामुळे शासकीय, अनुदानित आणि खासगी सर्व शाळांमध्ये एकसमान नियम लागू होणार आहे.राज्यातील सर्व विद्यार्थ्यांच्या अधिकृत नोंदींमध्ये आता आईचे नाव प्रथम नमूद केले जाणार आहे.

आईचे नाव, वडिलांचे नाव आणि त्यानंतर आडनाव असा नवीन क्रम निश्चित करण्यात आला आहे. येत्या शैक्षणिक वर्षापासून हा निर्णय तत्काळ प्रभावाने लागू करण्यात येणार आहे.

हा नियम सर्व शाळांना लागू असणार आहे. आईच्या योगदानाला योग्य सन्मान देणे, लिंग समानतेला प्रोत्साहन देणे आणि सामाजिक समतोल साधणे हा या निर्णयामागील उद्देश आहे.हजेरीपत्रक, गुणपत्रक, शाळा सोडल्याचा दाखला तसेच प्रवेश निर्गम उतारा या सर्व कागदपत्रांवर आईचे नाव नमूद केले जाईल.



# आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी स्वगणनेतून जनगणना मोहिमेला केली सुरुवात

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : राष्ट्रीय जनगणना 2027 प्रक्रियेला आजपासून महाराष्ट्रात औपचारिक सुरुवात झाली असून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी डॉ. विजय सूर्यवंशी यांनी स्वतः स्वगणना करून या उपक्रमाचा शुभारंभ केला. तसेच या जनगणनेसाठी नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले.**



पिंपरी चिंचवड महापालिका मुख्यालय येथे 1 मे महाराष्ट्र दिनाच्या व कामगार दिनाच्या शासकीय ध्वजारोहण सोहळ्यानंतर आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी जनगणनेशी संबंधित https://se.census.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन सर्व 34 प्रश्नांची माहिती ऑनलाइन भरत स्वगणना जनगणनेची प्रक्रिया पूर्ण केली. त्यानंतर त्यांना 'सेल्फ एन्युमरेशन आयडी' प्राप्त झाला. स्वतः पुढाकार घेत स्वगणना करून त्यांनी नागरिकांसमोर आदर्श निर्माण केला आहे.

महापालिका आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी डॉ.विजय सूर्यवंशी म्हणाले की, जनगणना ही केवळ आकडेवारी नसून ती देशाच्या विकासाचा पाया आहे. प्रत्येक नागरिकाने अचूक व प्रामाणिक माहिती देऊन या राष्ट्रीय कार्यात सहभागी व्हावे. स्वगणना ही सोपी, सुरक्षित आणि वेळ वाचवणारी प्रक्रिया आहे.

1 मे ते 15 मे 2027 या कालावधीत नागरिकांना घरबसल्या स्वगणना करण्याची सुविधा उपलब्ध असून, त्यानंतर 16 मे ते 14 जून दरम्यान प्रगणकांमार्फत घरोघरी जाऊन जनगणना प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे. या मोहिमेत जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी होऊन अचूक माहिती द्यावी, असे आवाहन देखील आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केले.

# मनपाच्या वतीने शिवरायांचा जिवंत इतिहास रंगमंचावर

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी - महाराष्ट्र दिन, जागतिक कामगार दिन आणि मराठी राजभाषा दिन या तिन्ही महत्त्वपूर्ण दिवसांचे औचित्य साधत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'जाणता राजा' या भव्य महानाट्याला नागरिकांनी दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद खरोखरच अभिमानास्पद आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे आदर्श नेतृत्व, दूरदृष्टी आणि जनकल्याणकारी विचार या महानाट्याच्या माध्यमातून प्रभावीपणे मांडणे आणि याद्वारे समाजाला प्रेरणा देणे हा यामागचा मानस असल्याचे मत महापौर रवि लांडगे यांनी व्यक्त केले तसेच या भव्य महानाट्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी केल्याबद्दल सर्व नागरिकांचे त्यांनी आभार मानले.

महाराष्ट्र दिन, जागतिक कामगार दिन तसेच मराठी राजभाषा दिनाचे औचित्य साधत महापालिकेच्या वतीने निगडी प्राधिकरण येथील मदनलाल धिंग्रा मैदान येथे आयोजित करण्यात आलेले 'जाणता राजा' हे भव्य ऐतिहासिक महानाट्य उत्साहात आणि दिमाखात पार पडले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रेरणादायी जीवनकार्याचे प्रभावी सादरीकरण अनुभवण्यासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली.

यावेळी आमदार उमा खापरे, उपमहापौर शर्मिला बाबर, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे, नगरसदस्या शैलजा मोरे, नगरसदस्य अमित गावडे, उप आयुक्त अण्णा बोदडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह अनेक मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महापौर रवि लांडगे यावेळी म्हणाले, महाराष्ट्र दिन हा आपल्या राज्याच्या अस्मितेचा, इतिहासाचा आणि प्रगतीचा अभिमान बाळगण्याचा दिवस आहे. त्याचप्रमाणे, जागतिक कामगार दिन आपल्याला कष्टकरी वर्गाच्या योगदानाची जाणीव करून देतो. उद्योग, विकास आणि शहरांची उभारणी ही कामगारांच्या अथक परिश्रमांवर उभी आहे. याशिवाय, मराठी राजभाषा दिनाच्या निमित्ताने आपण आपल्या मातृभाषेचा अभिमान बाळगला पाहिजे. मराठी भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून ती आपल्या संस्कृतीची, परंपरेची आणि विचारांची ओळख असल्याचे त्यांनी सांगितले.

छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवनकार्य आपल्याला आदर्श नेतृत्व, दूरदृष्टी आणि जनकल्याणाची प्रेरणा देते. 'जाणता राजा' सारख्या महानाट्याच्या माध्यमातून ही प्रेरणा नव्या पिढीपर्यंत पोहोचत आहे. आज नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या ऐतिहासिक कलाकृतीला दिलेला प्रतिसाद अभिमानास्पद असल्याचेही महापौर रवि लांडगे यावेळी म्हणाले.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 89999 48968